भारतीय कुस्ती महासंघावर पुन्हा हंगामी समिती

बजरंग, विनेश, साक्षी, सत्यवर्तच्या याचिकेवर न्यायालयाचा निर्णय

पीटीआय, नवी दिल्ली

दिल्ली उच्च न्यायालयाने भारतीय कुस्ती महासंघाच्या दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी पुन्हा एकदा हंगामी समिती नियुक्त करण्याचा आदेश शुक्रवारी दिला. या आदेशानुसार भारतीय कुस्ती महासंघाला (डब्ल्यूएफआय) कुठलाही उपक्रम हाती घेता येणार नाही.

'डब्ल्यूएफआय'ची निवडणूक झाल्यानंतर बजरंग पुनिया, विनेश फोगाट, साक्षी मलिक, सत्यवर्त काडियान या चौघांनी 'डब्ल्यूएफआय'ची कार्यकारिणी नको, तर हंगामी समितीकडे कार्यभार राहू दे अशा आशयाची याचिका दाखल केली होती. या याचिकेवर अंतरिम आदेश न्यायमूर्ती सचिन दत्ता यांनी दिला. हंगामी समिती जुनीच कायम ठेवायची की त्याची पुनर्रचना करायची या संदर्भातील निर्णय भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) निर्णय घ्यायचा आहे, असेही न्यायमूर्ती सचिन दत्ता यांनी स्पष्ट केले आहे. अनेक अडथळ्यानंतर २१ डिसेंबर २०२३ रोजी 'डब्ल्यूएफआय'ची निवडणूक पार पडली होती. ब्रिजभूषण शरण सिंह यांचे निकटवर्तीय संजय सिंह निवडून आल्याने बजरंग, विनेश, साक्षी आणि सत्यवर्त यानी पुन्हा एकदा निवडणुकीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देताना हंगामी समितीच कायम ठेवण्याची मागणी केली होती. पुढे घटनेनुसार निवडणूक न घेतल्याने क्रीडा मंत्रालयानेच नवी कार्यकारिणी निलंबित केली.

या दरम्यान संयुक्त जागतिक कुस्ती महासंघाने (यूडब्ल्यूडब्ल्यू) 'डब्ल्यूएफआय'वरील बंदी उठविण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे 'आयओए'ने मार्च २०२४ मध्ये हंगामी समिती बरखास्त केली होती. यावर ४ मार्च रोजी न्यायालयाने क्रीडा मंत्रालयासह 'डब्ल्यूएफआय' आणि हंगामी समितीला या कुस्तीगिरांच्या याचिकेसंदर्भात नोटीस बजावली होती. त्यानंतर ऑलिम्पिकसाठी संघ निवड प्रक्रियादेखील हंगामी समितीकडूनच राबविली गेली. ऑलिम्पिक संपल्यानंतर आता पुन्हा एकदा न्यायालयाने 'डब्ल्यूएफआय'चे अधिकार काढून घेण्याचा आदेश दिला.

पंतप्रधान, खेळाडूंमधील संवादाने पॅरिसचा प्रवास उलगडला

पीटीआय,नवी दिल्ली

पॅरिस ऑलिम्पिक दरम्यान भारतीय खेळाडूंना कशा प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागला, आव्हानांवर मात करण्यासाठी खेळाडूंनी काय मेहनत घेतली, त्यांना प्रेक्षकांमधून कसा पाठिंबा मिळत होता हा सगळा प्रवास स्वातंत्र्यदिनी झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि खेळाडू यांच्यातील संवादातून उलगडला गेला.

स्वातंत्र्य दिनाच्या लाल किल्यावरील कार्यक्रमानंतर पंतप्रधानांनी खेळाडूंशी ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून संवाद साधला. या संवादाची ध्वनीचित्रफीत समाजमाध्यमांवर झळकल्यानंतर तमाम भारतीयांना पॅरिस ऑलिम्पिकचा आनंद आणि रोमांचक क्षण अनुभवता आले. बॅडमिंटनपटू लक्ष्यशी पंतप्रधान म्हणाले, तुला पहिल्यांदा भेटलो तेव्हा तू खूप लहान होतास, आता तू वलयांकित खेळाडू बनला आहेस. यावर लक्ष्यने हो सर असे म्हणून आपला उपांत्य फेरीपर्यंतचा प्रवास उलगडला. प्रशिक्षक प्रकाश पदुकोण यांनी पहिल्या लढतीलाच माझ्याकडून भ्रमणध्वनी (मोबाईल) काढून घेतला आणि स्पर्धा संपल्यावर मिळेल असे सांगितले. जेव्हा मला मोबाईल मिळाला, तेव्हा मला किती पाठिंबा मिळत होता याची कल्पना आली. अर्थात, हा सगळा शिकण्याचा भाग होता, असे सांगितले. पदुकोण यांच्या शिस्तीचा धागा पकडून पंतप्रधान मोदी म्हणाले, प्रकाशसर इतके कडक असतील, तर पुढच्या वेळेसही त्यांनाच पाठवेन.

पॅरिस ऑलिम्पिक पर्यावरणपूरक करण्यासाठी प्रयत्न केले जात होते. त्यामुळे क्रीडा ग्राममधील कुठल्याही खोल्यांमध्ये वातानुकूलित यंत्रणा नव्हती. या संदर्भात मोदींनी हसत हसत विचारले की त्या वेळी कुठल्या खेळाडूने मोदी नुसते मोठ्या गप्पा मारतात, येथे खोल्यांत साधी वातानुकूलित यंत्रणाही नाही, काय हे असे विचारले. तेव्हा एकही खेळाडू काहीच बोलला नाही. पण, मला नंतर कळले की क्रीडा मंत्रालयाने ती देखील सुविधा उपलब्ध करून दिली आहे आणि खेळाडूंसाठी ४० प्रवासी वातानुकूलित यंत्रे पाठवून देण्यात आली. बघा सरकार तुमच्यासाठी किती प्रयत्न करते असे मोदी यांनीच सांगितले.

सेन्सेक्सची १३३० अंशांची मजल

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

गुंतवणूकदारांच्या झोळीत ७.३० लाख कोटी

भांडवली बाजारात प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स २ टक्क्यांनी वधारल्याने गुंतवणूकदार ७.३० लाख कोटींनी श्रीमंत झाले आहेत. सेन्सेक्सने सत्रात १४१२ अंशाची मजल मारल्याने मुंबई शेअर बाजारातील सूचिबद्ध कंपन्यांच्या बाजारभांडवलात शुक्रवारी ७.३० लाख कोटींची भर पडली आणि ते ४५१.५९ लाख कोटी (५.३५ ट्रिलियन डॉलर) रुपयांवर पोहोचले आहे.

मुंबई : अमेरिकेतील मंदीची भीती सरल्याने आणि दर कपातीची आशा जागृत झाल्याने देशांतर्गत भांडवली बाजारात त्या जोरावर प्रमुख निर्देशांकांनी २ टक्क्यांपर्यंत मुसंडी मारली. सेन्सेक्स १३३० अंशांची कमाई करत दोन आठवड्यांच्या उच्चांकी पातळीवर स्थिरावला. मंदीचे भय कमी झाल्याने त्याचे सकारात्मक पडसाद माहिती तंत्रज्ञान कंपन्यांच्या समभागांवर उमटले.

सप्ताहअखेर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १,३३०.९६ अंशांनी म्हणजेच १.६८ टक्क्यांनी झेप घेऊन ८०,४३६.८४ पातळीवर स्थिरावला. गेल्या दोन महिन्यांच्या कालावधीत एका सत्रात अनुभवलेली सर्वोत्तम वाढ आहे. दिवसभरात त्याने १,४१२.३३ मजल मारत ८०,५१८.२१ या सत्रातील उच्चांकी पातळीला स्पर्श केला होता. दुसरीकडे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीमध्ये ३९७.४० अंशांची भर पडली आणि तो २४,५४१.१५ अंशांवर स्थिरावला. साप्ताहिक आघाडीवर, सेन्सेक्सने ७३०.९३ आणि निफ्टीने १७३.६५ अंशांची कमाई केली आहे.

जपानी चलन येनमधील स्थिरता जागतिक बाजारपेठेत सुधारणा घडवून आणण्यात महत्त्वाची ठरली आहे. त्याशिवाय, मजबूत अमेरिकी किरकोळ विक्री आणि साप्ताहिक बेरोजगार दाव्यांमध्ये घट झाल्याने अमेरिकेत मंदीची शक्यता कमी झाली आहे. याबरोबर अमेरिकेतील महागाई कमी झाल्यामुळे बाजारात उत्साहाचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर, भारतीय माहिती तंत्रज्ञान (आयटी) कंपन्यांमध्ये गुंतवणूकदारांनी चौफेर खरेदीचे स्वारस्य दाखवले, असे मत जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी व्यक्त केले.

केसरी टूर्सला 'बेस्ट इंटरनॅशनल ग्रुप टूर ऑपरेटर' पुरस्कार

मुंबई: प्रसिद्ध पर्यटन कंपनी 'केसरी टूर्स'ला डीडीपी समूहाद्वारे आयोजित इंडिया ट्रॅव्हल २०२४ पुरस्कार सोहळ्यात 'बेस्ट इंटरनॅशनल ग्रुप टूर ऑपरेटर'चा पुरस्कार देण्यात आला. मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल येथे पार पडलेल्या कार्यक्रमात पर्यटन व आतिथ्य क्षेत्रातील ६४ यशस्वी उद्योजकांना त्यांच्या अतुलनीय कामगिरीसाठी पुरस्कार देण्यात आले.

पुरस्कारासंबंधी प्रतिक्रिया देताना केसरी टूर्सच्या संचालिका झेलम चौबळ म्हणाल्या, 'हा पुरस्कार म्हणजे योग्य दिशेने आपण प्रवास करत आहोत याची जाणीव आहे. शिवाय पर्यटन क्षेत्रात कायम नाविन्यपूर्ण सेवा देण्याचा ध्यास बाळगताना आणि सातत्यशील कार्याला मिळालेली ही पोचपावती आहे. त्यांच्यासह केसरी टूर्सच्या संचालिका संगीता पाटील यावेळी उपस्थित होत्या.

KOTAK MAHINDRA BANK LIMITED
Regd office: 27BKC, C 27, G Block, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai – 400 051
Corporate office: Kotak Infiniti, Bldg No 21, Infinity Park, General AK Vaidya Marg, Malad (E), Mumbai – 400 097 www.kotak.com

AUCTION NOTICE

That the below mentioned Borrower/s had availed gold loan facility against security of the gold ornaments/ items, as specified below. The Borrower/s defaulted in due repayment of the installments and outstanding dues and as a result of which the Bank was constrained to issue notices calling upon the Borrower/s to repay the outstanding amounts. However, the Borrower/s has failed to repay/clear his outstanding dues thereby compelling the Bank to auction the gold ornaments pledged in favour of the Bank.
The open auction of the above mentioned gold ornaments would be held on/after at :- Date: 26-Aug-2024 Time: 11:00 AM Place: Respective Sub Locations/E-Auction

ApplApac	Party Name	State	Location	Sub Location	Gross Wgt
GLN2262521	Nisha Prakash Movle	MAHARASHTRA	NAGPUR	DHARAMPETH	40.60
GLN2330641	Chanda Mahadeo Ratanpure	MAHARASHTRA	NAGPUR	DHARAMPETH	18.50
GLN3239863	Rupesh Punjaram Balki	MAHARASHTRA	NAGPUR	MEDISQUARE	8.14
GLN2924374	Prakash Movle	MAHARASHTRA	NAGPUR	TRIMRTNGR	19.60
GLN3125486	Suraj Jamnumal Chawla	MAHARASHTRA	NAGPUR	VARDHAMNGR	58.20
GLN3125414	Suraj Jamnumal Chawla	MAHARASHTRA	NAGPUR	VARDHAMNGR	46.10
GLN3005747	Tauqeer Khan Mohammad Javed Khan	MAHARASHTRA	NAGPUR	VARDHAMNGR	30.90
GLN2222761	Jisan Abdul Habib	MAHARASHTRA	NAGPUR	VARDHAMNGR	27.90
GLN3274913	Azaruddhin Mohammad Shahabuddin Siddiki	MAHARASHTRA	NAGPUR	VARDHAMNGR	6.78
GLN3248769	Md Saghir Md Khurshid Alam	MAHARASHTRA	NAGPUR	VARDHAMNGR	52.20

"Bidders are requested to Submit a copy of their Photo – identity, signature and address proof along with their original for verification together with two recent photographs at Respective Sub Locations. Also individual bidder should be present to handover the documents.The Bank reserves the right to change the venue/date/time of auction or cancel the auction / finalise the highest bid without any notice to bidders.
The cost of the auction process will be debited to the customer account. Bank reserves the right to recover the balance amount from the customer if the bid amount is insufficient to meet the payoff amount of the account.
For any further details/assistance/clarification regarding the terms and conditions of the auction, you are required to contact Mr.Rakesh Jaiswar 9926051414"

IDBI BANK CIN:L65190MH2004GOI148838

परिशिष्ट-IV {रुल 8(1)} ताबा सूचना (अचल संप्पती)

ज्याअर्थी खाली सही करणार आयडीबीआय बॅंक लि. चे प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांना मिळालेल्या अधिकारामध्ये सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002(54 चे 2022) व सिक्युरिटी अॅक्ट (एन्फोर्समेंट) नियम 2002 च्या नियम 3 सह सरफेसी कायद्याच्या कलम 13(12) अन्वये खालील कर्जदार/गहाणदार/जामीनदार मागणी नोटीस पाठवून नोटीशीत नमूद केलेल्या येणे रक्कम व इत्यादीच सदर नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत भरणा करण्याची मागणी केली होती.
कर्जदार/गहाणदार पूर्ण रक्कमांचा भरणा करु न शकल्याने संबंधित कर्जदार व सर्व सामान्य जनतेस सुचना देण्यात येते की , खाली सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या अधिकार अन्वये व कलम 13(4) सुरक्षा हित (अमलबजावणी)व नियम 8 नुसार खालील उल्लेखलेल्या मालमत्तेचा नमूद तारखेस रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे
विशेष करुन कर्जदार/गहाणदार तसेच सामान्य जनतेला याव्दारे खालील दिलेल्या संपत्तीबाबत कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे की पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे आयडीबीआय बॅंक लिमिटेडच्या प्रभाराधिन राहिल.
सुरक्षित मालमत्तेची पतरफेड करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, अधिनियमाच्या कलम 13 मधील उप—कलम (8) च्या तरतुदींकरता कर्जदाराचे लक्ष वेधले जात आहे.

अ. क्र.	कर्जदार/गहाणदार /जामिनदाराचे नाव	मागणी सूचनेची तारीख	ताबा दिनांक	संपत्तीचे वर्णन	एकुण रक्कम देय
1.	मे. फोरसाईट अॅग्रोटेक कन्सलटंट तर्फे प्रोप्रा. श्री राजेन्द्र शंकर बस्तेवार	०५.११.२०२२	१३.०८.२०२४ (प्रत्यक्ष ताबा)	मौजा सावंगी मेघे, प.ह.नं. १९, मौजा नं. १३८, ड्रीम लॅंड सिटी, जि. वर्धा ४४२००१ महाराष्ट्र येथील सर्व्हे नं. २५७/१, २५७/२, येथील मधील प्लॉट नं. ७३, क्षेत्रफळ १२० चौ.मी. आणि प्लॉट नं. ७४, क्षेत्रफळ १५० चौ.मी. व यावर बांधकाम यूनिट 'महामृत्युंजय' मालक श्री राजेन्द्र शंकर बस्तेवार. प्लॉट नं. ७३ व ७४ वर बांधलेले यूनिट 'महामृत्युंजय' ची चतुर्सिमा येणे प्रमाणे: पूर्वेस लेआऊट रोड, पश्चिमेस श्री नाखले यांची मालमत्ता, दक्षिणेस श्री सावरकर यांची मालमत्ता व उत्तरेस प्लॉट नं. ७५. जमीनीवर स्थित सर्व इमारती, स्ट्रक्चर ईत्यादींसह.	रु.६२,१५,२५३ + दिनांक ०२.०७.२०२२ पासून त्यावरील व्याज व इतर खर्च

दिनांक : 17/08/2024
स्थळ : वर्धा
प्राधिकृत अधिकारी, आयडीबीआय बॅंक लिमि.

अवशिष्ट भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता निर्गमन प्रस्ताव जाहीर घोषणा

स्कूटर्स इंडिया लिमिटेड
(भारत सरकारचा एक उपक्रम) सीआयएन : एल२५१११यूपी१९७२जीओआय००३५९९
पहिला मजला, ३/४८१, विकल्प खंड, गोमती नगर, लखनौ, यूपी-२२६ ०१०, भारत. टेलिफोन नं. ०५२२-३११९५९३
ई-मेल : csscootersindia@gmail.com, वेबसाइट : www.scootersindialimited.com

निर्गमन प्रस्ताव जाहीर घोषणा (**''निर्गमन प्रस्ताव जा.घो.''**) सेबी (डिलिस्टिंग ऑफ इक्विटी शेअर्स) रेग्युलेशन्स, २०२१चे रेग्युलेशन २६ व अन्य लागू तरतुदी आणि जड उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्लीमार्फत भारताच्या राष्ट्रपतींद्वारे वेळोवेळी सेबीमार्फत मंजूर केलेली सूट, कंपनीचे प्रवर्तक, कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापन संचालक, सध्या असलेले श्री. नवीन कौल (**''प्राप्तकर्ता''**) यांच्याद्वारा प्रतिनिधित्व करीत असलेले, या अनुसार, स्टॉक एक्स्चेंजकडील म्हणजेच बीएसई लिमिटेडकडील (**''बीएसई''**) प्रत्येकी रु. १०/-चे (**''इक्विटी भाग''**) दर्शित मूल्य असलेले कंपनीचे पूर्णतः भरणा केलेल्या इक्विटी भागांच्या स्वेच्छेने डिलिस्टिंगसंबंधित ''स्कूटर्स ऑफ इंडिया''च्या (**''कंपनी''**) उर्वरित सार्वजनिक भागधारकांकरिता (**''अवशिष्ट भागधारक''**) निर्गमित करण्यात येत आहे. ही ''निर्गमन प्रस्ताव जाहीर घोषणा'' प्रारंभिक जाहीर घोषणा दिनांकित ०३ मे, २०२३ (**''आयपीए''**), जाहीर घोषणा दिनांकित ०६ डिसेंबर, २०२३, ०८ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध झालेली व ०९ डिसेंबर, २०२३ (**''पीए''**) आणि प्रस्ताव पत्र दिनांकित २० डिसेंबर, २०२३ (**''प्रस्ताव पत्र''**)च्या अनुषंगाने आहे. शर्तींचा वापर केलेला आहे; परंतु या जाहिरातीत याबाबत व्याख्या केलेल्या नाहीत, त्या ''आयपीए'', ''पीए'' व ''प्रस्ताव पत्र''मध्ये नेमून दिल्यानुसार अर्थपूर्ण असणार आहेत.

''बीएसई''ने तिच्या दिनांकित ०५ जून, २०२४ सूचना क्र. २०२४०६०५-५१ द्वारा असे कळविले आहे की, कंपनीच्या इक्विटी भागांमधील व्यापार (स्क्रिप कोड : ५०५१४१) १२.०६.२०२४च्या प्रभावापासून खंडित केला आहे आणि वरील संदर्भित स्क्रिप २० जून, २०२४ च्या प्रभावापासून ''बीएसई''कडून डिलिस्ट करण्यात आली आहे.

अवशिष्ट भागधारक ज्यांच्याजवळ अजूनही डिलिस्टिंग प्रस्तावानंतर इक्विटी भाग आहेत ते २०.०६.२०२४ पासून ते १९.०६.२०२६ पर्यंत किंवा सेबी (**''निर्गमन विंडो''**)द्वारा अनुमती दिल्यानुसार सदर अलिकडील तारखेस प्रति इक्विटी भाग (**''निर्गमन किंमत''**)नुसार रु. ३१.७८ प्राप्तकर्त्यास त्यांच्या इक्विटी भागांच्या निविदेकरिता सक्षम असणार आहेत. निर्गमन अर्ज प्रपत्रासमवेत प्रस्तावाचे निर्गमन पत्र (**''प्रस्तावाचे निर्गमन पत्र''**) अवशिष्ट भागधारकांकरिता पाठविण्यात येत आहे.

अवशिष्ट भागधारक कोणत्याही विलंबाशिवाय आवश्यक कागदपत्रांसमवेत त्यांचे निर्गमन अर्ज प्रपत्रे सादर करू शकतील. कृपया नोंद घ्यावी की, प्राप्तकर्ता संबंधित कॅलेंडर महिना संपताच कामकाजाच्या १० दिवसांच्या आत, ज्यावेळी प्राप्तकर्त्याद्वारा निर्गमन अर्ज प्रपत्र स्वीकारला गेला आहे, मासिक प्रदान तत्त्वावर (**''मासिक प्रदान कालचक्र''**) प्रदान करील. पहिले मासिक प्रदान कालचक्र ३१ ऑगस्ट, २०२४ पासून कामकाजाच्या १० दिवसांच्या आत सुरू करण्यात येईल.

प्रस्तावाचे निर्गमन पत्र किंवा कोणताही पुढील तपशील किंवा शंका याबाबत स्वीकृती न झाल्यास, तुम्ही रजिस्ट्रारला लेखी विनंती पाठवू शकाल किंवा www.scootersindialimited.com या कंपनीच्या वेबसाइटवरून किंवा याखालील विनिर्दिष्ट व्यवस्थापक/ रजिस्ट्रारच्या वेबसाइटवरून त्याकरिता सॉफ्ट प्रत डाऊनलोड करू शकाल :

निर्गमन प्रस्तावाकरिता व्यवस्थापक	निर्गमन प्रस्तावाकरिता रजिस्ट्रार
Corporate Professionals **कॉर्पोरेट प्रोफेशनल्स कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड** डी-२८, साऊथ एक्स्टेन्शन पार्ट-१, नवी दिल्ली-११० ०४९, भारत **संपर्क व्यक्ती : श्रीमती अंजली अग्गरवाल;** **फोन :** ०११-४०६२२२३०/४०६२२२०९ **ई-मेल :** mb@indiacp.com; **वेबसाइट :** www.corporateprofessionals.com **सेबी नोंदणी क्र. :** आयएनएम०००००११४३५ **वैधता कालावधी :** कायमस्वरूपी **कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर :** यू७४८९९डीएल२०००पीटीसी१०४५०८	Skyline Financial Services Pvt. Ltd. **स्कायलाइन फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड** डी-१५३-ए, पहिला मजला, ओखला इंडस्ट्रियल एरिया, फेज-I, नवी दिल्ली-११० ०२०, भारत **संपर्क व्यक्ती : श्री. पवन सिंह बिश्ट;** **फोन :** ०११-२६८१२६८२/८३ व ६४७३२६८१ ते ८८ **ई-मेल :** admin@skylinerta.com; **वेबसाइट :** www.skylinerta.com **सेबी नोंदणी क्र. :** आयएनआर०००००३२४१ **वैधता कालावधी :** कायमस्वरूपी **कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर :** यू७४८९९डीएल१९९५पीटीसी०७१३२४

प्राप्तकर्त्याच्या वतीने आणि करिता
स्वाक्षरी/-
नवीन कौल
(अधिकृत स्वाक्षरीकर्ता)

स्थळ : लखनौ
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२४

लोकनेते माजी आमदार
प्रा. सुरेशभाऊ देशमुख
अमृत महोत्सव
कृतज्ञता वर्ष २०२३-२०२४

अमृत महोत्सव
लोकनेते माजी आमदार प्रा. सुरेशभाऊ देशमुख

सांगता समारोह

शनिवार, दि. १७ ऑगस्ट २०२४
वेळ : दुपारी २.०० वाजता
स्थळ : यशवंत महाविद्यालय, वर्धा

समारोहाचे अध्यक्ष
मा.खा.श्री. शरदचंद्र पवार
माजी केंद्रीय मंत्री, भारत सरकार
तथा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)

प्रमुख पाहुणे
मा.ना.श्री. नितीन गडकरी
केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री
भारत सरकार

विशेष उपस्थिती
मा.आ.श्री. बाळासाहेब थोरात — माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.आ.श्री. जयंत पाटील — माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)
मा.आ.श्री. अनिल देशमुख — माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.श्री.जयंत पाटील — माजी आमदार तथा नेते, शेतकरी कामगार पक्ष
मा.श्री. अमर काळे — खासदार, वर्धा लोकसभा

अमृत महोत्सव समिती
मा. श्री. दत्ताजी मेघे — माजी मंत्री तथा माजी खासदार, नागपूर
मा. श्री. अरविंद पोरेड्डीवार — माजी अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सह.बँक, गडचिरोली
मा. श्री. रामदास तडस — माजी खासदार, वर्धा लोकसभा
मा. श्री. गिरीश गांधी — माजी आमदार, नागपूर
मा. श्री. सुभाष धोटे — आमदार, राजुरा
मा. श्री. राजेन्द्र जैन — माजी आमदार, गोंदिया
मा. श्री. हर्षवर्धन देशमुख — अध्यक्ष, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती
मा. श्री. राजेंद्र शिंगणे — आमदार तथा माजी मंत्री, महा. राज्य
मा. श्री. संतोषराव कोरपे — अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, अकोला
मा. श्री. प्रवीण देशमुख — सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, राळेगांव

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा
: कार्यकारी मंडळ :
समीर देशमुख, अध्यक्ष — सतीश राऊत, उपाध्यक्ष
प्रकाश ढांगे, जनरल सेक्रेटरी — डॉ. किशोर अहेर, संचालक
शशांक घोडमारे, संचालक — डॉ. दिलीप गोडे, संचालक
रणजित शिंदे, संचालक — विजय भोमले, संचालक
ॲड. राहुल धांदे, संचालक

यशवंत विद्यालय
* अंदोरी * आगरगांव * अल्लीपूर * भिडी
* यशवंत माध्यमिक कन्या शाळा, देवळी
* देहेगांव (गो) * घोराड * हमदापूर
* हिंगणी * जयपूर * केळझर
* मांडगांव * नाचणगांव * सेलू
* सेवाग्राम * सोनोरा * तळेगांव (टा)
* विजयगोपाल * वायगांव (नि)
* वायफड * येळाकेळी * झडशी

यशवंत सॅपलिंग (कॉन्व्हेंट)
* सेवाग्राम * अल्लीपुर

यशवंत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय
* अल्लीपूर * भिडी
* देहेगांव (गो.) * मांडगांव
* नाचणगांव * विजयगोपाल
* वायगांव (नि.) * सेवाग्राम

यशवंत प्राथमिक शाळा
* अल्लीपूर * सेलू (बेलगांव) * देवळी

महाविद्यालय
* यशवंत महाविद्यालय, वर्धा
* यशवंत महाविद्यालय, सेलू
* बापुराव देशमुख अभियांत्रीकी महाविद्यालय, सेवाग्राम
* एस.एस.एन.जे. महाविद्यालय, देवळी
* यशवंत महाविद्यालय, वायगांव (निं.)

अमृत महोत्सव सांगता समारोहाला येणाऱ्या सर्व पाहुण्यांचे **हार्दिक स्वागत**

पेगॅसस ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
PEGASUS
कॉर्पोरेट कार्यालयः 55-56, पाचवा मजला, फ्री प्रेस हाउस, नरीमन पॉईन्ट, मुंबई- 400 021.
नोंद. कार्यालयः 507, दलामल हाऊस, जमनालाल बजाज रोड, नरीमन पॉईन्ट, मुंबई-400021.

ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी जाहीर सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 व 9 सह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तांची विक्री.

याद्वारे कर्जदार,सह-कर्जदार व गहाणकार आणि सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की **पेगॅसस 2023 ट्रस्ट 10 (पेगॅसस) चे विश्वस्त म्हणून काम पाहणारया पेगॅसस ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड** यांचेकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्ता असलेल्या अनामत मत्ता **जना स्मॉल फायनान्स बँक लि. (''जेएमएफबीएल'')** यांनी **दि. 28.03.2024** रोजीच्या अभिहस्तांकन करारान्वये खाली नमूद केलेल्या कर्जदाराची कर्जे त्यातील सुरक्षा हितासह अभिहस्तांकित केलेली असून त्यांची **दि. 20.09.2024** रोजी **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर विक्री करण्यात येईल.
जेएसएफबीएल च्या प्राधिकृत अधिकारयांनी सर्फेसी अधिनियम आणि त्याअंतर्गत नियमांमधील तरतुदींतर्गत दि. 03.07.2024 रोजी खालील वर्णनाच्या अचल मालमत्ता असलेल्या अनामत मत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे.

कर्जदार,सह-कर्जदार व जामीनदाराचे नाव	अ) श्री जावेद साहेब जब्बार साहेब (कर्जदार) ब) श्रीमती नम्मा परवीन जावेद साहेब (सह-कर्जदार)
अनामत मत्तांची ज्यासाठी विक्री करण्यात येत आहे ती थकबाकी	07.08.2024 रोजीनुसार रु. 12,64,829.14 (रुपये बारा लक्ष चौसष्ट हजार आठशे एकोणतीस आणि चौदा पैसे फक्त) त्यावरील **दि. 08.08.2024** पासून ते भरणा आणि वसुलीच्या दिनांकापर्यंतचे करारातील दराने व्याज, शुल्के, खर्च व अधिभार.
विक्री करण्यात येणारया अचल मालमत्ता असलेल्या अनामत मत्तेचे तपशील	**गहाणकारः श्री जावेद साहेब जब्बार साहेबः** प्लॉट क्र. 9, क्षेत्रफळ सुमारे 153 चौ.मी., गट क्र. 1160/ड, मौजा पारस भाग-1, तहसील बाळापूर व जिल्हा अकोला. चतुःसीमाः पूर्वेस- प्लॉट क्र. 10, पश्चिमेस- शेत, उत्तरेस- रस्ता आणि दक्षिणेस - प्लॉट क्र. 18.
ज्यापेक्षा कमी किमतीस अनामत मत्तेची विक्री करण्यात येणार नाही ती आरक्षित किंमत	रु. 8,95,000/- (रुपये आठ लक्ष पंच्याण्णव हजार फक्त)
बयाणा रक्कम	रु. 89,500/- (रुपये एकोणनव्वद हजार पाचशे फक्त)
मालमत्तेवर करण्यात आलेले दावे आणि सुरक्षित धनकोस ज्ञात असलेले इतर बोजे व त्यांचे मूल्य	ज्ञात नाहीत
मालमत्तेची पाहणी	24.08.2024 रोजी स. 11.30 ते दु. 1.30 वाजेपर्यंत
संपर्क व्यक्ती व फोन क्र.	श्री सिद्धेश पवार-व्यवस्थापक-9029687504 (प्राधिकृत अधिकारी) श्री निलेश मोरे -व्यवस्थापक-9004722468
बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक	19.09.2024 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत
बोली उघडण्याची वेळ व स्थान	दि. 20.09.2024 रोजी स. 11.00 ते दु. 02.00 वाजेपर्यंत वेबसाईटच्या माध्यमातून ई-लिलाव / बोली (www.foreclosureindia.com) (https://bankauctions.in)

हे प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 अंतर्गत वर नमूद कर्जदार / सह-कर्जदार / गहाणकार यांचेसाठी **पंधरा (15) दिवसांची सूचना** देखील आहे.
ई-लिलावात सहभागी होण्यासाठी आपली बोली सादर करण्याअगोदर विक्रीच्या अटी व शर्तीचा तपशीलासाठी आणि इतर तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला म्हणजे **http://www.pegasus-arc.com/assets-to-auction.html** येथे किंवा वेबसाईटला **(www.foreclosureindia.com) (https://bankauctions.in)** येथे भेट द्यावी किंवा सेवा पुरवठादार **मे. 4क्लोजर यांचेशी संपर्क साधावा. कोणतीही बोली सादर करण्याअगोदर संपर्क साधावा श्री अरिजित दास, संपर्क क्रमांकः 8142000725, ईमेल आयडी: info@bankauctions.in/arijit@bankauctions.in.**

स्थानः अकोला
दिनांकः 17.08.2024
स्वा/-
प्राधिकृत अधिकारी,
पेगॅसस ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड,
पेगॅसस 2023 ट्रस्ट 10 चे विश्वस्त म्हणून काम पाहणारे

हे पत्र मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४००० फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाउस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.